दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

बुधवार दि.२६ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१९१ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# संत तुकाराम गाथेतील अभंग दृकश्राव्य स्वरूपात आणणार-मंत्री उदय सामंत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिर्डी । प्रतिनिधी**

राज्य शासन संत आणि वारकऱ्यांच्या नम्रता व शालीनतेच्या शिकवणुकीनुसार वाटचाल करत असून, संत तुकारामांची गाथा डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल शासनाने उचलले आहे. गाथेतील साडेचार हजार अभंग नामवंत गायकांच्या आवाजात स्वरबद्ध करून दृकश्राव्य माध्यमातून सादर केले जाणार असल्याची माहिती राज्याचे मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.

वारकरी साहित्य परिषद, महाराष्ट्र आयोजित १३ व्या अखिल भारतीय मराठी संत साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी संमेलनाध्यक्ष ह.भ.प. संजय महाराज देहूकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, माजी खासदार सदाशिवराव लोखंडे, वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील, ह.भ.प.निवृत्ती महाराज नामदास, ह.भ.प चकोर महाराज बावीस्कर, ह.भ.प. श्रीकांत गणेश राजा (तामिळनाडू), ह.भ.प.कृष्णा महाराज शिऊरकर (कर्नाटक),ह.भ.प. उद्धव महाराज कुकुरमुंडेकर (गुजरात), ह.भ.प. चैतन्य महाराज कबीर आदी उपस्थित होते.केंद्र शासनाने यावर्षी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे असे नमूद करून उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, बहिणाबाई यांच्या साहित्यातून मराठी अभिजात भाषेचे दर्शन घडते. वारकरी संप्रदाय ही आपली संस्कृती आहे. वारकऱ्यांची परंपरा व किर्तन गावोगावी पोहोचविण्यासाठी वारकरी साहित्य संमेलनांचे ग्रामीण भागात आयोजन होणे गरजेचे आहे. संत साहित्य गावागावांत पोहोचले तर इंग्रजीच्या



प्रभावात घट होऊन मराठीबद्दल प्रेम वाढणार आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्वांनी मराठीचा सन्मान केला पाहिजे. मराठी भाषा विभागाचे कार्यक्षेत्र आंतरराष्ट्रीय आहे. जगात १७ बृहन्महाराष्ट्र मंडळे आहेत. येत्या काळात या मंडळांची संख्या वाढवून ५० करण्यात येणार आहे. आपल्या संत साहित्याचे श्रेष्ठत्व जगाला कळावे यासाठी परदेशातही संत संमेलन भरविण्याची गरज आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.राज्य शासन वारकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून संत साहित्य संमेलनासाठी दरवर्षी १५ लाख रुपयांचे अर्थासहाय्य दिले जाईल, अशी ग्वाही श्री.सामंत यांनी यावेळी दिली. श्री.कोळेकर म्हणाले, महाराष्ट्राचा पुरोगामी वारसा टिकविण्यात संत, वारकऱ्यांचे अमूल्य योगदान आहे. ह.भ.प.नामदास महाराज, श्रीकांत गणेश राजा, कृष्णा महाराज शिऊरकर, उद्धव महाराज कुकुरमुंडेकर,चैतन्य कबीर महाराज यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी उद्योगमंत्री सामंत यांच्या हस्ते वारकरी संप्रदायासाठी अमूल्य कार्य केल्याबद्दल वारकरी विठ्ठल पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये ह.भ.प.वै.भाऊसाहेब महाराज पाटील (निपाणी, कर्नाटक), ह.भ.प.वै. पांडुरंग महाराज काजवे (कोगनोळी, कर्नाटक) व ह.भ.प.वै. बाळासाहेब भारदे (माजी विधानसभा अध्यक्ष) यांच्या वारसांनी या पुरस्काराचा स्विकार केला. वारकरी संप्रदायात विशेष कार्य केल्याबद्दल जीवन गौरव पुरस्कार ह.भ.प. गोपाळ महाराज गोसावी यांना जाहीर झाला. त्यांच्यावतीने ह.भ.प. माधव महाराज शिवणीकर यांनी या पुरस्काराचा स्विकार केला. याप्रसंगी महाराज यांचे वंशज ह.भ.प.निवृत्ती महाराज नामदास यांना चारचाकी वाहन प्रदान करण्यात आले.

# कलकत्ता काव्य महोत्सव २०२५ मध्ये बुलढाणा जिल्ह्याची गगन भरारी!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कलकत्ता । प्रतिनिधी**

जागतिक कविता दिवसाचे औचित्य साधून राममोहन – विद्यासागर कॅडेमी वेस्ट बेंगाल तथा जी.एच.आर.पी.एफ् न्ड रिसर्च सेंटर आणि क्रिष्टी पठार आसाम तसेच सहेली सपथ वेस्ट बेंगाल सह कवि महल वेस्ट बेंगाल या सर्व मानवीय सेवाभावी, साहित्यिक व सामाजिक तथा शैक्षणिक व संवैधानिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि. २० मार्च ते २४ मार्च या पंचदिवसीय कलकत्ता काव्य महोत्सव २०२५ मधे महाराष्ट्रातील ज्येष्ठ विधिज्ञ तसेच बहुजन साहित्य संघ, चिखली चे अध्यक्ष साहित्यिक, कवी आणि हरहुन्नरी कलावंत डॉ. विजयकुमार कस्तुरे, डव्होकेट, चिखली, बुलढाणा, महाराष्ट्र यांना विशेष अतिथी या नात्याने निमंत्रित करण्यात येवून बहुमानाच्या इश्वरचंद्र विद्यासागर व राजा राममोहन रॉय पुरस्कार तसेच आलोक बॅनर्जी मेमोरियल वॉर्ड हे राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्याच बरोबर सामाजिक सेवेसाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठातर्फे मानद डॉक्टरेट प्राप्त कवी




डॉ. डी. व्ही. खरात, चिखली , बुलढाणा यांना ( ज्यांनी वंदेमातरम हे गीत लिहिलेले आहे, त्यांच्या नांवे अर्थात ) बंकिमचंद्र चटर्जी पुरस्कार तथा वैशिष्ट्यपूर्ण कथाकथनासाठी ज्यांना अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्रदान झालेली आहे असे ज्येष्ठ साहित्यिक व कवी कथाकार यांना स्वामी रामकृष्ण परमहंस पुरस्काराने आणि भावकवी अंकुश पडघान बोरगाव काकडे, चिखली, बुलढाणा यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार प्रदान करून जीएच आरपीएफचे अध्यक्ष तथा या महोत्सवाचे आयोजक मा. महानंदा सरकार व संयोजक मा. सुनील चक्रबोर्ती तथा नेपाळ, भारत व इतर देश विदेशातील मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच सर्वांनी आपापल्या परीने विविध भाषेतील कविता, गीत, कथा यांचे प्रभावी सादरीकरण करून वातावरणात चैतन्य निर्माण केले. या अविस्मरणीय सोहळ्यात मां.ओशोककुमार चोक्रोबोर्ती, बरूण चोक्रोबोर्ती, ब्रिगेडीयर टी. के. मुखर्जी, वेस्ट बेंगाल, दीपम दत्ता, आसाम, बिश्वोजित बोंडोपाध्याय, वेस्ट बेंगाल, तुसार कांती, मलायलाह बिश्वोभारती, वेस्ट बेंगाल आणि डॉ. चिरूमणी, बाल नृत्य कलावंत तथा ज्युडो चॅम्पियन, चित्रकार, गायिका तसेच पुरस्कार प्राप्त कु. सौमिली दास सह दुसरी बाल नृत्य कलावंत कु. क्रित्तिका इत्यादी साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# मराठवाड्यातील विविध विकास प्रश्नांच्या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्र्यांशी खा.अजित गोपछडे यांची चर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

मराठवाड्यातील पाणीपुरवठ्यासह मूलभूत सोयी सुविधांच्या अनुषंगाने खा.डॉ.अजित गोपछडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन चर्चा केली. मराठवाड्यातील विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी निधीची विशेष तरतूद करावी अशी मागणी ही यावेळी खासदार गोपछडे यांनी केली आहे .

स्वतंत्र भारतामध्ये मराठवाडा तब्बल एक वर्षानंतर स्वतंत्र झाला त्यामुळे मराठवाड्याचा विकास आजपर्यंत म्हणावा तसा झाला नाही.भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ नंतरही मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यात आलेला नाही.मराठवाड्यातील पिण्याच्या पाण्याचे प्रश्न,कृषी सिंचनाचा प्रश्न,रोजगार, उद्योग, शिक्षण,आरोग्य,ग्रामीण विकास यासह अनेक प्रश्न आजही जसेच्या तसे आहेत.मराठवाडा दुष्काळग्रस्त भाग म्हणून आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा भाग म्हणून ओळखला जातो. मराठवाड्याला लागलेला दुष्काळग्रस्ततेचा आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी हा कलंक पुसून काढण्यासाठी मराठवाड्यात विकासाचा



अनुशेष भरून काढण्यासाठी केंद्र सरकारने विशेष निधीची तरतूद करावी.वॉटर ग्रीडचा प्रकल्प त्वरित सुरू करून तो पूर्णत्वास न्यावा.कृषी सिंचनाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाणी वाटपाचा न्यायिक प्रश्न मार्गी लावावा याशिवाय रोजगार निर्मिती,महिला आर्थिक सक्षमीकरण,विकास,सहकार क्षेत्रासाठी दुध उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करणार,बायोगॅस योजना प्रकल्प सुरु करण्यासाठी केंद्र सरकारकडे मागणी शेतकरी व संबंधित योजना याना अनुदान देण्यात यावे व मराठवाडा विकास सिंचन, शिक्षण, कृषी, आरोग्य, रेल्वे, रोजगार,विमान उडान योजना,वीज निर्मिती प्रकल्प,नांदेड मध्ये सोयाबीन इंडस्ट्री उद्योग सुरू करण्यासाठी व नांदेड येथून मुंबई वंदे भारत एक्सप्रेस सुरू करण्यासाठी आदी प्रश्न सोडवावेत यासाठी आपण स्वतः लक्ष द्यावे अशी विनंती ही खा.डॉ.अजित गोपछडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केली आहे.

# बहुजन साहित्य संमेलनातील कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी.वा.ना.आंधळे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**एरंडोल । प्रतिनिधी**

दि.३१ मार्च २०२५ रोजी मातृतीर्थ सिंदखेडराजा जि. बुलडाणा येथे एक दिवसीय बहुजन साहित्य संमेलनाचे आयोजन बहुजन साहित्य संघ चिखली यांनी केले असून या संमेलनात कथाकथन,परिसंवाद,कविसंमेलन या विविध कार्यक्रमांचे भरगच्च आयोजन करण्यात आले आहे.

मान्यवरांचे कवी संमेलन संपन्न होत असून कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी एरंडोल जि. जळगाव येथील कवी तथा व्याख्याते प्रा.वा. ना.आंधळे यांची निवड बहुजन साहित्य संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केलीय.बहुजन संघाचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.विजयकुमार कस्तुरे व संमेलन संयोजक तथा दै.लोकनेताचे संपादक श्री.ज्ञानेश्वर बुधवंत यांनी या निवडीबाबतचे निमंत्रण पत्र नुकतेच प्रा.आंधळे यांना पाठविले आहे.प्रा.आंधळे गेल्या चार दशकांपासून काव्यलेखन करीत असून आजवर पाच राज्यस्तरीय साहित्य संमेलनात कवी संमेलनाचे अध्यक्षपदासह तीन राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होण्याचा मान त्यांना मिळाला आहे.विविध शालेय व विद्यापीठीय



अभ्यासक्रमात त्यांच्या कविता प्रकाशित झालेल्या आहेत.सदर साहित्य संमेलनात महाराष्ट्रभरातून कवी लेखक साहित्यिकांना निमंत्रित करण्यात आलेले असून साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.गणेश गायकवाड यांची निवड करण्यात आलीय.तर केंद्रीय मंत्री मा.ना.प्रतापराव जाधव साहेब यांचे शुभहस्ते संमेलनाचे उदघाटन संपन्न होत आहे.स्वागताध्यक्षपदी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.संघर्ष सावळे यांची निवड करण्यात आलीय.प्रा.आंधळे यांच्या या यशदायी वाटचालीचे व निवडीचे त्यांच्या चाहत्यांकडून अभिनंदन होत आहे.

# नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील ईपीएस निवृत्ती धारकांच्या धरणे आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

ईपीएस ९५ राष्ट्रीय संघर्ष समितीतर्फे मंगळवार दि.२५ रोजी नांदेड येथील जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन धरणे आंदोलन करण्यात आले.राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने ९ वर्षापासून पेन्शनवाढ व इतर मागण्यासाठी आंदोलने करण्यात येत आहेत. रास्ता रोको आंदोलन, अर्धनग्न आंदोलन, मुंडण आंदोलन, भिक्षा मागो आंदोलन, दिल्ली येथे दरवर्षी जंतरमंतर मैदानावर धरणे आंदोलन, रामलीला मैदानावर आंदोलन अशी सर्वप्रकारची आंदोलने करण्यात आली. तसेच सर्व संसद सदस्यांना वेळोवेळी समक्ष भेटून चर्चा करून निवेदन देण्यात आले. त्यामुळे नांदेड सह देशभरातील सर्व ठिकाणी धरणे आंदोलन करण्यात आले . पेन्शनरांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.किमान निवृत्तिवेतन ७५०० रुपये द्या, महागाई भत्ता आणि पती-पत्नी यांना मोफत वैद्यकीय सुविधा द्याव्यात या प्रमुख मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय संघर्ष समिती ईपीएस तर्फे नांदेड जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# लोकप्रिय आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांचा गाडेगाव येथे भव्य नागरी सत्कार संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातून आमदार पदी निवड झाल्यानंतर प्रथमच गाडेगाव येथील ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार सोहळा करण्यात आला. नागरी सत्कार सोहळ्यात लोकप्रिय आमदार श्री आनंदराव पाटील बोंढारकर साहेब म्हणाले मला मतदान रुपी आशीर्वाद दिल्याबद्दल सर्व गाडेगांव गावकऱ्यांचे आभार मानतो. यावेळी त्यांच्या सोबत उपस्थित भाजपा विधानसभा अध्यक्ष बालाजी पाटील पुणेगावकर, शिवसेना जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, शिवसेना शहरप्रमुख तुलजेश यादव, तालुकाप्रमुख अशोक मोरे, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, शिवसेना उपतालुकाप्रमुख बाबुराव पाटील गाडेगावकर,बळी पाटील उबाळे, युवासेना उपतालुकाप्रमुख गजु पाटील उबाळे यांच्यासह गाडेगांव येथील गावकरी मंडळी, माता, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# उमरी तालुक्यांतील राशनच्या महा घोटाळ्यांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करा!

## जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांना पुरवठा मंत्रालयाचे पत्र!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | किशनराव गायकवाड**

उमरी तालुक्यातील खरेदी विक्री संघाचे चेअरमन यांच्या मार्फत मौ गोळेगाव, चिंचाळा आणि शेलगाव येथील रास्तभाव दुकानदार आनंदा विठ्ठल कवळे, यांनी अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना आणि एपीएल शेतकरी योजनेतील मोफत धान्य व आनंदाचा शिधा इत्यादी धान्य गरीब व गरजू शिधापत्रिकांना मिळावे म्हणून केंद्र व राज्य सरकारने चालू केलेली पंतप्रधान गरीब कल्याण अन्नसुरक्षा योजना राबविण्यात येत आहे. परंतु वरील खरेदी विक्री संघ चेअरमन उमरी मौ गोळेगा येथील रास्त भाव दुकानदार यांनी गरीबांचे मोफत गव्हु, तांदूळ, साखर व इतर धान्य ज्या लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न लाखो रुपयाच्या वर आहे. ज्या व्यक्तीकच्या कुटुंबात शासकीय - निमशासकीय कर्मचारी, पेन्शन धारक व्यक्ती आहेत, चार चाकी वाहने, ट्रॅक्टर, जेसीबी आहेत, ऊस उत्पादक बागायती शेतकरी, आरसीसी इमारती असलेल्या श्रीमंत धनदांडग्या शिधापत्रिका धारकांना आणि कुटुंबातील मयत व्यक्तीच्या नावाने गव्हु, तांदूळ, साखर व इत्यादी धान्य उचलून सदर धान्य घरी न खाता जनावरांना आणि काळ्या बाजारात जादा भावाने विक्री करून पैसा कमवित आहेत . या श्रीमंत व धनदांडग्या लाभधारकांना धान्याची गरज नाही. त्यांचे राशन बंद करून त्यांचे राशन कार्ड शुभ्र राशन कार्डात वर्ग करावे म्हणून संबंधित जिल्ह पुरवठा अधिकारी नांदेड यांचेकडे निवेदने देऊन मागणी केलेली होती परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड सदर महा घोटाळा थांबवुन श्रीमंत व धनदांडग्या लाभधारकांचे धान्य बंद करावे. आणि संबंधित रास्त भाव दुकानदारावर कार्यवाही करावे म्हणून भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य किशनदादा गायकवाड कुदळेकर यांनी तहसीलदार उमरी व जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांना शेकडो वेळा लेखी व तोंडी निवेदने दिलेले होते. परंतु



राशनच्या महा घोटाळ्यात संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचे हात गुंतलेले असल्यामुळे या कडे दुर्लक्ष करून त्यांची पाठराखण करीत होते. चौकशी आज करू - उद्या करू आम्हाला हेच काम आहे काय? अशा प्रकारे उडवा -उडवीची उत्तरे देऊन टाळाटाळ करून त्यांची पाठराखण करीत होते. भ्रष्टाचारी जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांची संबंधितावर कार्यवाही करण्याची इच्छा नाही हे लक्षात आल्यावर किशनदादा गायकवाड कुदळेकर यांनी थेट तत्कालीन पुरवठा मंत्री ना. धनंजय मुंडे यांची दि २३/०१/२५ रोजी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांची मंत्रालयात भेट घेऊन संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांच्यावर कारवाई करण्यात यावी म्हणून किशनदादा गायकवाड यांनी निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेऊन अन्न, नागरी पुरवठा विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालयाचे कक्ष अधिकारी नितीन ग. सोनखासकर यांनी उमरी तालुक्यातील राशनच्या महा घोटाळ्यांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावे. अशा अशयाचे पत्र जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड यांच्या नावाने दि १९ मार्च २५ रोजी तक्रार क्रमांक - २५२५/ प्र.क्र.१०२/ नापु -३१ काढलेले असुन अर्जदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून त्याबाबतचा वस्तूनिष्ठ आव्हाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यालयात पाठविण्यात यावे. असे सदर पत्रांत म्हटले असुन उपायुक्त ( पुरवठा) छत्रपती संभाजी नगर यांना उचित कार्यवाहीस्तव अग्रेसित व निवडनस्ती/ नापु -३१ इत्यादींना प्रति पाठविण्यात आलेल्या आहेत. परंतु जिल्हा पुरवठा अधिकारी नांदेड हे त्यांच्यावर कारवाई करतात की सदर पत्र पायदळी तुडवतात याकडे सर्व जिल्ह्यांचे लक्ष लागलेले आहे.

# अर्धापूर पंचायत समितीच्या शासकीय महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी शितल कांबळे

## गटविकास अधिकारी दत्तात्रेय कदम यांनी केले स्वागत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव | संदीप कदम**

अर्धापूर दि.२५ (ता.प्र.) अर्धापूर पंचायत समितीच्या शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या छळवणूक संबंधीच्या तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी एकात्मिक बालविकास प्रकल्पाच्या कनिष्ठ सहाय्यक शितल गौतम कांबळे यांची निवड करण्यात आली.शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळवणूक संबंधीच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी या कार्यालयातील महिला अधिकारी / कर्मचाऱ्यांची व अशासकीय महिला सदस्यांचा समावेश करून तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली.



या तक्रार निवारण समितीत अध्यक्ष शितल गौतम कांबळे, उपाध्यक्ष प्रतिमा सिध्दोधन गोणारकर, सचिव गोदावरी लक्ष्मणराव बुडकेवार, सदस्य अनुसया काळे, अशासकीय सदस्य रामचंद्र माणिका मनपुर्वे यांची निवड करून समिती गठीत करण्यात आली.अर्धापूर पंचायत समितीच्या महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी शितल कांबळे यांची निवड झाल्याबद्दल पंचायत समितीच्या वतिने स्वागत करण्यात आले. यावेळी अर्धापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी दत्तात्रेय कदम, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.श्रीकांत देशाई , गटशिक्षणाधिकारी लोकदाजी गोडबोले, कक्ष अधिकारी श्याम कावळे, पंचायत विस्तार अधिकारी विश्वनाथ मुंडकर, आरोग्य विस्तार अधिकारी डॉ.एस.पी.गोखले, कनिष्ठ सहाय्यक संतोष वारकड, राजेश जाधव, कनिष्ठ लिपिक विजय निकम, अभियंता उत्तम ढाले ,सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रतिमा गोणारकर, अनुसया काळे,सुविद्या वाकळे यांच्यासह पंचायत समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जि.प.प्राथमिक शाळा दगडवाडी येथे नऊ साक्षरांची परीक्षा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**

दिनांक २३ मार्च २०२५ रोजी उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत सन २४-२५ मध्ये नोंदणी झालेल्या नवसाक्षरांची परीक्षा शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद जालना यांचे वतीने आयोजित करण्यात आली होती. चालू शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दगडवाडी या गावातील नोंदणी झालेल्या एकूण १८ नवसाक्षरांपैकी ११ महिला व ७ पुरुष आजच्या परीक्षेसाठी उपस्थित होते.आज रोजी सकाळी १० ते १ या वेळेत ही परीक्षा पार पाडली.परीक्षा सुरळीत पार करण्यासाठी केंद्र संचालक म्हणून मुख्याध्यापक पुंडलिक सोनुने यांनी तर पर्यवेक्षक म्हणून श्री एस जे शेख, संदीप वायाळ सहायक म्हणून गजेंद्र येवले, मनिषा अंभोरे यांनी काम पाहिले. नवसाक्षरांच्या उपस्थितीसाठी इयत्ता आठवीतील स्वयंसेवक विद्यार्थी यांनी मदत केली.यावेळी केंद्र प्रमुख गणेश सोळुंके सर यांनी परीक्षा केंद्रावर भेट दिली.



### धनाजी जोशी यांचा सवाल

## देगलूरच्या रखडलेल्या विकासाबाबत आमदार महोदय विधानसभेत आवाज उठवणार का ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर | प्रतिनिधी**

मुंबई येथे अधिवेशन सुरू होऊन पंधरा दिवस उलटून गेले असुन, अनेक आमदार महोदय आप आपल्या मतदारसंघातील विकासाबाबत पोटतिडकीने आपले म्हणे विधानसभा अध्यक्ष यांच्या समोर मांडत असताना,



केंद्रात व राज्यात भारतीय जनता पक्षाचे सरकार असुन सुद्धा, भारतीय जनता पक्षाचे देगलूर बिलोली मतदारसंघाचे सन्मानिय आमदार जितेश अंतापुरकर साहेब हे देगलूर बिलोलीच्या मतदारसंघातील रखडलेल्या विकासाबाबत विधानसभेत का आवाज उठवत नाहीत ? याबाबत धनाजी जोशी यांनी आमदार जितेश अंतापुरकर साहेब यांना सवाल केला आहे नांदेड देगलूर बाबतअकोला-संगारेड्डी हा राष्ट्री महामार्ग क्र. १६१ पैकी अकोला-वाशिम हिंगोली ते नांदेड असे २०० किलोमीटर काम पूर्ण झाले आहे. संगारेड्डी येथून य महामार्गाचे काम देगलूर जवळील मदनूर मिर्झापूरपर्यंत १३५ किलोमीटरचे का पूर्ण झाले आहे. केवळ राज्यसीमा देगलूर ते वाजेगाव-नांदेड असा ८५ किलोमीट एवढाच भाग तांत्रिक कारणास्तव पूर्ण झालेला नाही याबाबत तसेच नांदेड बिदर नवीन रेल्वे लाईनच्या कामाबाबत, देगलूर-उदगीर रस्त्याचे कामाबाबत, देगलूर-मुखेड रस्त्याच्या कामाबाबत, उपजिल्हा असलेल्या देगलूर बसस्थानकात २५ नविन बसेस मंजूर होऊन सुध्दा अजून नवीन बसेस उपलब्ध झाले



नाहीत याबाबत,लिंगनकेरूर तलावाच्या शुशोभिकरणासाठी पंधरा कोटी रुपये निधी मंजूर होऊन सुध्दा कामाला सुरुवात झाली नाही याबाबत, देगलूर उपजिल्हा रुग्णालयात नविन सोई सुविधा व जास्तीचे बेड उपलब्ध करून देण्याबाबत असे अनेक प्रश्न प्रलंबित असताना आमदार जितेश अंतापुरकर साहेब विधानसभेत का आवाज उठवत नाहीत याबाबत धनाजी जोशी यांनी देगलूर बिलोलीच्या विकासाबाबत विधानसभेत आमदार जितेश अंतापुरकर साहेब यांनी आवाज उठवुन देगलूर बिलोली मतदारसंघात जास्तीत जास्त विकास कामे आणून समस्त देगलूरकरांना सोई सुविधा उपलब्ध करून द्यावे असेही धनाजी जोशी यांनी सांगितले.

# अवैध रेती उपसा विशेष मोहिम

## मौजे इसरुल येथे चार बोटी नष्ट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलडाणा | प्रतिनिधी**

अवैध रेती उपसा करणाऱ्या बोटींचा शोध घेण्यासाठी जिल्ह्यामध्ये विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने बुलढाणा उपविभागीय कार्यालय व आपत्ती व्यवस्थापन पथकाव्दारे खडकपूर्णा धरणातील अवैध उपसा करणाऱ्या मौजे इसरुल येथे आज दि. २५ मार्च रोजी मोठी कारवाई करत चार बोटी नष्ट केल्या, अशी माहिती उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांनी दिली.

सदर कारवाई जिल्हधिकारी डॉ. किरण पाटील व उपविभागीय अधिकारी शरद पाटील यांच्या



मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. यावेळी तहसिलदार संतोष काकडे, संभाजी पवार, श्रीकृष्ण जाधव, मंडळ अधिकारी भगवानराव पवार, ग्राम महसूल अधिकारी योगेश भुसारी, ना.पो.का विलास पवार, सुनील डव्हळे, अनिल बोंद्रे, विनोद गिरी, नितीन काळे, महसूल सेवक प्रभाकर इंगळे, वाहन चालक संतोष भोपळे, तसेच पोलीस विभागाचे प्रतिनिधी, मंडळ अधिकारी, तलाठी उपस्थित होते. तसेच ब्लास्टिंगसाठी सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसीलदार देऊळगाव राजाचे वैशाली डोंगरजाळ यांचे सहकार्य लाभले.



दानापूर येथील जुई नदीवर ,मा.ना.श्री. रावसाहेब पाटील दानवे माजी केंद्रीय मंत्री, मा. आ.श्री. संतोष पाटील दानवेआमदार भोकरदन जाफराबाद, यांच्या प्रयत्नातून दिनांक२५.०३.२०२५ या रोजी को .प. बंधाऱ्याच्या कामाचे उद्घाटन जनसामान्याचे नेतृत्व, कर्तव्यदक्ष, मा. जि.प.सदस्या सौ. आशाताई मुकेश राव पांडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी गावातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते (छाया लोकनेता न्यूज नेटवर्क भोकरदन राम शिंदे)

# पेठवडज येथील परफेक्ट इंग्लिश स्कूल अखव्या महाराष्ट्रात परफेक्ट

## सुवर्ण पदक ७,रजत पदक १२,कांस्य पदक ६ मिळवून महाराष्ट्रात अव्वल स्थानी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**नांदेड । बाजीराव पाटील**

पेठवडज ता.कंधार जि.नादेड येथील परफेक्ट इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षा २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्यात परफेक्ट डंका वाजविला आहे.संपुर्ण महाराष्ट्र राज्यांमधून ७ सुवर्ण पदक,१२ रजत पदक ,६ कांस्य पदक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या उज्वल कामगिरीमुळे संपूर्ण परफेक्ट इंग्लिश स्कूल मध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.संस्थापक सचिव श्री गोविंदराव केंद्रे साहेब व प्राचार्या सौ अनुराधा पवार मॅडम आणि प्रि प्रायमरी इंग्लिश स्कूल च्या मुख्याध्यापिका रेखाताई पोतदार मॅडम यांच्या सह शिक्षिका, शिक्षक यांच्या मध्ये आनंदाचे वातावरण आहे.ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकास आणि तर्कशक्ती तपासणारी अत्यंत प्रतिष्ठित परीक्षा आहे.





महाराष्ट्र राज्यभरातून हजारो विद्यार्थी या परीक्षेत सहभागी झाले होते, पेठवडज येथील परफेक्ट इंग्लिश स्कूलने कठोर परिश्रम आणि सातत्याने शिक्षण देऊन महाराष्ट्र राज्यात उच्च स्थान प्राप्त केले आहे. त्या विद्यार्थ्यांमध्ये अनुश्री अशोक तेलंग, कार्तिक संतोष डावकोरे, राजीव रामदास गायकवाड, साई कैलास गायकवाड, सार्थक पांडुरंग केंद्रे, नवनाथ संभाजी अष्टुरे, श्रीकांत गोविंद पवळे यांनी सुवर्ण पदक मिळविले आहे.आणि प्रभूतनया सुनील पाटील, शाकीब इलाई शेख, पंकजा माधव इटकापल्ले, कुणाल संभाजी गायकवाड, धीरज धनंजय पवळे, रितेश तुकाराम कार्लेकर, श्रुती खंडोजी नुकुलवाड, शाद इलाई शेख, शुभम कोंडीबा बोरकर, आदित्य बालाजी गायकवाड, गणेश प्रल्हाद यारसनवार, श्रुती गजानन वडजे यांनी रजत पदक मिळविले आहे.तसेच अनुजा माधव मिसे, हर्षवर्धन हनुमंत डाकूरवार, अभिजीत साहेबराव सोनकांबळे, गौरवी गजानन हिवराळे, सिद्धी मन्मथ चिटकुलवार, वैभव वसंत कौशल्ये यांनी कांस्य पदक मिळविले आहे.या यशाबद्दल परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज चे संस्थापक सचिव आदरणीय गोविंदराव केंद्रे साहेब यांनी सांगितले की,ही आमच्या शाळेसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनतीने अभ्यास करून महाराष्ट्र राज्यातून ७ सुवर्ण पदक,१२ रजत,६ कांस्य पदक मिळवून यश संपादन केले आहे. त्यामुळे त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी परफेक्ट इंग्लिश स्कूल च्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा देतो.



त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल परफेक्ट इंग्लिश शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.संस्थापक सचिव श्री गोविंदराव केंद्रे साहेब,शिक्षक, कुटुंबीय आणि मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील शैक्षणिक यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.संपुर्ण महाराष्ट्रात परफेक्ट इंग्लिश स्कूलने अव्वल स्थान कायम राखले आहे.त्यामुळे पालक व नागरीकांनी शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव केंद्रे साहेब यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे.या यशाबद्दल परफेक्ट इंग्लिश स्कूल च्या प्राचार्या सौ अनुराधा पवार मॅडम,प्रि प्रायमरी इंग्लिश स्कूल च्या मुख्याध्यापिका रेखाताई पोतदार मॅडम यांचे तसेच सर्व परफेक्ट इंग्लिश स्कूल च्या शिक्षीका, शिक्षक यांचें सर्वत्र कौतुक होत आहे.

# आळंदी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

आळंदी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित मुख्याधिकारी श्री. माधव खांडेकर यांचा महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न,महाराष्ट्र राज्य पथारी सुरक्षा शाखा आळंदी भाजी मंडई यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हाध्यक्ष संतोष सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली श्री.संत ज्ञानेश्वर माऊलींची प्रतिमा,हार, पुष्पगुच्छ शाल,श्रीफळ देऊन मुख्याधिकारी श्री.माधव खांडेकर यांचा आळंदी नगरपरिषद कार्यालयात भव्य सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न पथारी सुरक्षा दल आळंदी शहर महिला आघाडी अध्यक्षा सपना काळे उपाध्यक्षा सीमा मेटकरी,गीता राऊत,रुक्मिणी तिडके,अश्विनी जाधव व सर्व पदाधिकारी महिला,पुरुष कार्यकर्ते व पुणे जिल्हा उपाध्यक्ष बाळू जाधव ,पुणे जिल्हा सचिव सचिन काळे आळंदी शहर उपाध्यक्ष राजू दराडे भाजी मंडई शाखा अध्यक्ष निलेश ढोकणे,राहुल रायबोले विशंभर गायकवाड,अशोक लोंढे,संतोष बवले, ज्ञानेश्वर जाधव ,प्रभाकर आवरे,गोरक्ष खांडे,भिसे मामा,नवनाथ तिडके,जयेश गांधी आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी पुणे जिल्हाध्यक्ष संतोष सोनवणे म्हणाले, मुख्याधिकारी श्री. माधव खांडेकर यांनी नातेपुते नगरपरिषदेत मुख्याधिकारी म्हणून उल्लेखनीय काम केले आहे.श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीस्थळाने पवित्र असणाऱ्या तीर्थक्षेत्र आळंदीतील नागरीक, वारकरी, भाविक, व्यापारी, कामगार,कष्टकरी यांच्या अपेक्षा व गरजा पुर्ण कराव्यात अशी प्रार्थना श्री.संत ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी केली.सत्काराला उत्तर देताना,मुख्याधिकारी श्री. माधव खांडेकर म्हणाले,पुढील आठवड्यात भाजी मंडई ,झाडी बाजार व आळंदीतील शहरातील सर्व विक्रेते यांची एकत्रित बैठक घेतली जाईल व आपल्या सर्व समस्या सोडविल्या जातील असे आश्वासन दिले.

# महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी नांदेडमध्ये भव्य महामोर्चा





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिहार येथील ऐतिहासिक महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे आणि १९४९ चा टेम्पल कायदा रद्द करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी आज नांदेडमध्ये भव्य महामोर्चा काढण्यात आला. हजारोंच्या संख्येने बौद्ध अनुयायी, बौद्ध भंतेजी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे पदाधिकारी या आंदोलनात सहभागी झाले होते. महामोर्चाची सुरुवात शहरातील नवीन मोंढा या ठिकाणाहून करण्यात आली करण्यात आली महात्मा फुले चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर थेट मोर्चा बिहार सरकार विरोधी नारे देत निघाला. यावेळी मोर्चेकऱ्यांनी घोषणाबाजी करत बौद्ध धर्मीयांच्या हक्कांची जाणीव करून दिली. यावेळी बौद्ध नेत्यांनी सांगितले की, महाबोधी विहार हा जागतिक बौद्धांचा पवित्र तीर्थक्षेत्र असूनही तो बौद्धांच्या ताब्यात नाही, हे अन्यायकारक आहे. १९४९ च्या टेम्पल कायद्यामुळे बौद्ध समाज आपल्याच धार्मिक स्थळी स्वतंत्रपणे व्यवस्थापन करू शकत नाही. त्यामुळे हा कायदा त्वरित रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. महामोर्चाच्या अखेरीस जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या आंदोलनात विविध बौद्ध संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बुद्ध धम्म अनुयायी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलन शांततेत पार पडले असून, प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# गुरुकुल प्रि-प्रायमरी नॅशनल स्कुल अॅन्ड क्लासेस गुरुकुल स्नेहसंमेलन २०२५ थाटात संपन्न

## बाल कलाकारांच्या कलागुणांनी प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिरसाळा । प्रतिनिधी**

गुरुकुल प्रि-प्रायमरी नॅशनल स्कुल अॅन्ड क्लासेस, औरंगपूर रोड, सिरसाळा येथे गुरुकुल वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ रविवार, दि. २३ मार्च २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या थाटात पार पडले.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली.जयतु भारतम् ज्ञानं परमं बलम् या बोध वाक्यप्रमाणे शाळेचे कार्य सुरू असून. चिमुकल्या कलाकारांच्या कलेच्या साधनेचा परमोच्च क्षण म्हणजे सुहृदय रसिक प्रेक्षकांसमोर कलाविष्काराचे जल्लोषात सादरीकरण करून चिमुकल्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष श्री. भागवत (बप्पा) देशमुख (तज्ञ संचालक, तेलगाव सहकारी साखर कारखाना), बाबासाहेब अनुरथ बरीदे सर (प्राचार्य, मोटेगावकर सरांचे रेणुका पब्लीक स्कुल, रेणापूर-लातूर), सुदाम (आप्पा) देशमुख (सेवा सोसायटी चेअरमन), नितीन ढाकणे (संपादक, दैनिक अतुल्य महाराष्ट्र न्यूज नेटवर्क ), धनंजय आरबूने (तालुका प्रतिनिधी पुण्य नगरी), अमोल सुर्यवंशी (तालुका उपाध्यक्ष डिजिटल मीडिया परिषद), मिलींद चोपडे (अध्यक्ष, पत्रकार संघ सिरसाळा),अतुल बडे (पत्रकार संघ, सिरसाळा), अशोक गलांडे (पत्रकार संघ, सिरसाळा), व्ही. एस. मुंडे (केंद्र प्रमुख, सिरसाळा), सुमंत अण्णा देशमुख (मोहा), शरद (काका) कदम (अध्यक्ष, कृषी युनियन सिरसाळा), सतिश काळे (ड.संभाजीनगर), रूपनर साहेब (पो.स्टे. सिरसाळा), देवराव काळे (ग्रामपंचायत सदस्य, सिरसाळा), मधुकर हरिभाऊ टोंपे (गोवर्धन), सतिश सलगर (सरपंच, वाघाळा) उपस्थित होते.



या वार्षिक स्नेहसंमेलनात विदयार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला याची प्रस्तावना व आयोजन शाळेचे सदस्य श्री नवगरे सर यांनी केले. विवेक पवार( MBBS, Solapur), रिझवान इनामदार( LLb Mumbai), संतोष जाधव (MBBS amravti) श्रियोग जाधव ( इंटर.उ.-.), समर्थ कराड ( eng.sambhajinagar), मानसी चोपडे(b.sc. श्रीरामपूर), श्रुती महाजन ( B-MS,jalna) , पल्लवी ललवाणी (c.s. executive), शुभांगी बाबर( b.sc) , शुभम फुलारी (MBBS+ co founder af chhatrapati sahayak unit ), यश राठोड ( engineering kolhapur) अमित भिसे (engineering), प्रगती काळे ( BAMS), वैष्णवी जाधव ( MBBS Mumbai). वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादरीकरण केले जसे की गणेश वंदना , गोंधळ , नव्वद च्या दशकातील लोकप्रिय गाणी , शंभू राजे, मराठी गाणी , कव्वाली, नाटके , गरबा तसेच देशभक्ती गाण्यांनी प्रेक्षकांची मन मोहित केली.या कार्यक्रमात प्रीतम राठोड, शोएब शेख, सोफियान पठाण, राधिका कुशवाहा , यशश्री सांगळे, जान्हवी देशमुख , आरोही उपादे, मुन्नाजा पठाण , माहिरा पठाण या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन खूप प्रभावीरीत्या केले . या संमेलनास मोठ्याप्रमाणात विद्यार्थी पालक आणि सिरसाळा येथील श्रोतेगण यावेळी उपस्थित होते. बाल कलाकारांचा आनंद द्विगुणीत करणाऱ्या या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांच केलेले सादरीकरण डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. सांस्कृतिक, देशभक्तीपर , हिंदी मराठी आणि इंग्रजी गीतांचे बहारदार सादरीकरणात यावेळी चिमुकल्यांसह मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाचे भव्य असे आयोजन महेश भागवतराव देशमुख (अध्यक्ष, गुरुकुल स्कुल अॅन्ड क्लासेस, सिरसाळा), सचिन जिवनराव घाडगे सर (उपाध्यक्ष, गुरुकुल स्कुल अॅन्ड क्लासेस, सिरसाळा), यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद, गुरुकुल नॅशनल स्कुल अॅन्ड क्लासेस येथील सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेत कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नयन कुमार सर यांनी केले. तसेच कार्यक्रमाची समाप्ती शांती पाठाद्वारे झाली.

# रानडुक्करच्या हल्यात मृत्यू पावलेल्या शेतकऱ्याच्या वारसांना

# आ.प्रतापराव पा.चिखलीकर यांच्या पाठपुराव्यातून मा.अजित पवार यांच्या हस्ते २५ लाखांचे धनादेश सुपूर्द

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । संतोष पाटील जाधव**

लोहा कंधार विधानसभा क्षेत्रातील शिराढोण येथील शेतकरी रमेश किशनराव शिंदे यांचा दि.२५ मार्च २०२५ रोजी रानडुकराच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. रमेश शिंदे यांच्या कुटुंबीयांना लोहा विधानसभेचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठपुराव्यामुळे वनविभागाच्या शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई म्हणुन २५ लक्ष रुपयेचा धनादेश स्वागत लॉन्स, नांदेड जि.नांदेड येथे राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब, राज्याचे सहकार मंत्री माननीय नामदार श्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री नवाब मलिक, माजी मंत्री संजय बनसोडे, तसेच लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील






चिखलीकर यांच्या हस्ते मयत यांच्या पत्नी श्रीमती इंदुबाई शिंदे यांना १० लक्ष रुपयांचा नगदी धनादेश व १५ लक्ष रुपये त्यांच्या नावे बँकेमध्ये मुदत ठेवी करिता धनादेश असा २५ लक्ष रुपयांचे धनादेश देण्यात आले. तसेच श्री.बापुराव किशन पसार हे रानडुक्कराच्या हल्ल्यात जखमी झाले होते, त्यांना नुकसान भरपाई म्हणुन ३९ हजार ६५७ रुपयाचा धनादेश या ठिकाणी देण्यात आला.सदरील सदर मयताच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई मदत मिळण्यासाठी केशव वाभळे,(भा.व.से.), उपवनसंरक्षक, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली खाली श्री.भीमसिंग ठाकूर सहाय्यक वनसंरक्षक नांदेड, संदीप शिंदे वनपरिक्षेत्र अधिकारी (प्र.) नांदेड यांनी नुकसान भरपाई मिळण्याकरिता शासनाकडे पाठपुरावा केला आहे. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार राजू नवघरे, आमदार राजेश विटेकर, माजी आमदार मोहनराव हंबर्डे माजी आमदार अविनाशराव घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर जिल्हाध्यक्ष जीवनराव घोगरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रविण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस वसंतराव सुगावे, मुक्तेश्वर धोंडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य पाटील बोरगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर, साईनाथ पाटील कपाळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# अपर पोलीस महासंचालक श्री.नवल बजाज लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

दिनांक २४ मार्च २०२५ रोजी पासून महाराष्ट्र राज्य दहशतवाद विरोधी पथकचे अपर पोलीस महासंचालक श्री. नवल बजाज हे वार्षिक निरीक्षण व तपासणी ०३ दिवसीय लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून त्यानिमित्त आज रोजी पोलीस मुख्यालयात पोलीस समारंभ कवायतचे (परेड) आयोजन करण्यात आले होते. समारंभ कवायतचे (परेड) श्री. नवल बजाज यांनी निरीक्षण केले.



परेड चे संचालन पोलीस अधीक्षक, श्री सोमय मुंडे, सेकंड इन-कमांड, बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे, खझड परिविक्षाधीन अधिकारी यांनी केले. पोलीस परेड नंतर लातूर पोलीस दलाकडून मॉब डिसपर्सल, दंगा काबू योजना ची प्रत्यक्षिक सदर करण्यात आले. तसेच पोलिस अधीक्षक कार्यालयातील नवीनच बनविण्यात आलेले मंथन मीटिंग हॉल चे उद्घाटन श्री. नवल बजाज यांचे हस्ते करण्यात आले. श्री.नवल बजाज यांचे मार्गदर्शनात गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली यामध्ये पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, परीक्षाधीन पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी, शाखा प्रभारी अधिकारी यांची उपस्थिती होती.

## बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या वतीने

# गुढीपाडव्यापासून मोफत शुद्ध पाणी घरपोच जनतेनी लाभ घेण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पेठवडज । प्रतिनिधी**

पेठवडज येथील जनतेला कळविण्यात येते की श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या वतीने गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर पेठवडज नगरीतील प्रत्येक माता भगिनींना व बांधवांना पिण्याचे पाणी घरपोच मोफत मिळणार आहे.आपल्या गावातील जनतेला डोक्यावर हंडा घेऊन जाण्यापासून मुक्त करणार असल्याचे डावकोरे साहेब यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे.



प्रत्येक घरी नळ योजनेचे पाणी येत आहे. काही अपवाद असू शकेल. परंतु नळाचे पाणी स्वयंपाक व पिण्यास वापरत नाहीत. गावातील काही लोकांकडून पेठवडज प्रकल्पा च्या खाली असलेल्या पाझर चलम्यातून तर काही लोकं संत रोहिदास महाराज सभागृहाच्या परिसरात असलेल्या बोर चे पाणी डोक्यावर हंडा घेऊन जातात. ही बाब आम्हांस भूषणावह वाटत नाही. म्हणून अशा प्रत्येक कुटुंबाला दररोज चाळीस लिटर पाणी घरपोच मोफत बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या माध्यमातून उपलब्ध करून देत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. तसेच त्यांनी आवाहन केले आहे कि आपण आमच्या श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी कडे नोंद करावी.नोंद विनामूल्य आहे. आपण आम्हांस फक्त वीस लिटर चे कॅन उपलब्ध करून द्यावीत. सदरील सेवा आम्ही गुढीपाडव्या पासून उपलब्ध करून देत आहोत तरी जास्तीत जास्त लोकांनी सेवेची संधी द्यावी असे श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि.पेठवडज च्या अध्यक्षा सौ सुनिता अशोकराव डावकोरे व श्री अशोक डावकोरे साहेब तांत्रिक सल्लागार श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज यांनी आवाहन केले आहे.

# ज्ञानज्योती बहुऊदेशी राष्ट्रीय प्राध्यापक डॉ.सोपान सुरवसे यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिड । प्रतिनिधी**

ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दिला जाणारा मराठी भाषा संशोधन व संवर्धन अध्यापन कार्य गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२५ सन्मानपूर्वक प्राध्यापक डॉ.सोपान सुरवसे यांना प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून रेखाताई भंडारे , मराठी ग्रामीण साहित्य संमेलन अध्यक्ष प्रा.डॉ. केशव देशमुख, स्वागताध्यक्ष मा. पोपटराव पठारे व प्रमुख पाहुणे म्हणून आमदार हेमंत भोसले यांच्या उपस्थितीत देण्यात आला. प्रा डॉ सोपान माणिकराव सुरवसे यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ सुरेंद्र अलुरकर, मा. डॉ हेमंत वैद्य, कार्यवाह भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, स्वातंत्र्यवीर सावरकर शैक्षणिक संकुल अध्यक्ष.मा. डॉ पुरुषोत्तम कुलकर्णी, स्थानिक कार्यवाह डॉ अविनाश देशपांडे, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष.मा.प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ उत्तम साळवे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# शहीद दिनानिमित्ताने अर्धापूर येथे आयोजित रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद

## ४५ रक्तदात्यांनी केले रक्तदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

निमा व डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने अर्धापूर येथे शाहिद दिनानिमित्ताने रक्तदान शिबिरांचे आयोजन केले होते.रक्तदान शिबिरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय निमाचे माजी अध्यक्ष डॉ सत्यनारायण बंग होते. मान्यवरांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले प्रमुख पाहुणे डॉ सत्यनारायण बंग,पप्पू पाटील कोंढेकर,कार्याध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटी अर्धापूर नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रविण देशमुख ,तालुका आरोग्य अधिकारी डॉ श्रीकांत देसाई,यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ अविनाश वाघमारे मा सहासचिव डॉ उदयसिंघ चव्हाण तालुका अध्यक्ष निमा डॉ विनोद जाधव,डॉ सौ आरती राऊत, बाळासासाहेब देशमुख,बळीराम




हाटेकर,पत्रकार गुणवंत विरकर,बालाजी चाभरकर,उपस्थितीत होते. शिबिर यशस्वी होण्यासाठी डॉ ओमप्रकाश जडे ,डॉ शरद चरखा, डॉ नितीन हाके, डॉ विशाल लंगडे,डॉ देशमुख, डॉ प्रल्हाद डाकोरे,डॉ राजेश राऊत,डॉ सुनील सोनटक्के. परमेश्वर लालमे, रवि

# मॅरेथॉन स्पर्धेत पुरुषा मध्ये परभणीचे गायकवाड महिलांमध्ये परिमल बाबर यांनी मारली बाजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गंगाधर । दुसलवाड कुंडलवाडी**

कुंडलवाडी शहर वासियांच्या वतीने २३ मार्च रोजी राज्यातील मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत शेकडो, युवक , युवती,महीला पुरुष प्रौढ वुद्धानी सहभागी होऊन स्पर्धा मध्ये सहभाग घेतला होता . यात पुरुषां मध्ये परभणीचा पाराजी गायकवाड .महिलांमध्ये परभणीच्या परिमल बबार ह्या प्रथम आल्या . सदर स्पर्धा ही२३ मार्च रोजी सकाळी६वाजता चालू झाली. या स्पर्धेत पुरुषांसाठीअडीच. कि.मी. जाणे व अडीच कि.मी. येणेअसे ऐकु पाचकिलो मीटर अंतर धावणे कारन होते .ही स्पर्धा बसवेश्वर चौक चुंगी नाका शहीद भगत सिंग रोड येथुन सुरुवात झाली. याशिवाय महिला वर्गासाठी सुद्धा ऐक किलोमीटर जाणे व ऐक किलोमीटर येने अशी दोन किलो मिटर अंतर धावण्याची स्पर्धा. ठेवण्यात आलेली होती.या राज्यातील स्पर्धा प्रथम आलेल्या पाराजी बाबुराव गायकवाड स्पर्धाकास सामान्य चिन्ह व ५००१रुपये महिलांमध्ये परिमला बालासाहेब बाबर या महिला ने प्रथम पारितोषिक ५हजार रुपये सन्मान चिन्ह पदक पटकावले . योगेश राजाभाऊ पडोळे यांना द्वितीय पारितोषिक सन्मान चिन्ह३००० रुपये देऊन सन्मानित करण्यात आले. माधव तुकाराम मरेमतकर यांना तृतीय पारितोषिक सन्मान करण्यात आला आहे . महिलांमध्ये शितर साहलु बैलकर यांनी २०००रूपेय रोख याशिवाय प्रोत्साहन पर विशेष तीन पारितोषिक पदक देऊन सन्मान करण्यात आला आहे . महिलांमध्ये शितल सायलु बैलकर यांनी ३००० रुपये तुतीय पारितोषिक सन्मान चिन्ह पदक जिंकले आणि शिवानी सायलु रॅपनवर यांनी २०००रुपेय तृतीय पारितोषिक सामान्य चिन्ह पदक मिळविले व याशिवाय प्रोत्साहन विशेष तिन पारितोषिक पदक मिळविले व याशिवाय प्रोत्साहन विशेष तिन पारितोषिक पदक देऊन सन्मान करण्यात आले आहे.यात विजय पोतत्रा गटुवार प्रथम क्रमांक पटकावला तर दितीय अशोक राजेश करपे आणि तुतीय क्रमांक अतिष सयाराम अष्टमरवार मिळविले.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904